Publication: Punyanagari
Date: 30/3/2019
Page: 4
Column: 2-4

पुण्यनगरी ।शनिवार, ३० मार्च २०१९

# अर्थ अवरमधून पर्यावरण संवर्धनाचे आवाहन

**।मुंबई : अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड या खाजगी वीज वितरण कंपनीने शनिवार, ३० मार्च सायंकाळी ८.३० ते ९.३० या काळात वीजवापर स्वेच्छेने बंद ठेवून वीजग्राहकांनी पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

एमईएलच्या प्रवक्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पर्यावरणाच्या दृष्टीने सजग संस्था या नात्याने अर्थ अवर या उपक्रमाच्या माध्यमातून सर्व भागधारकांमध्ये शाश्वत जीवनाचा प्रसार करायचा आहे. संसाधनांचे संवर्धन करणे व त्यांचा कार्यक्षमतेने वापर करणे



महत्त्वाचे असल्याचा विश्वास एईएमएलचा विश्वास असल्याचे सांगण्यात आले आहे.

पृथ्वीचे सरासरी भूपृष्ठीय तापमान १९ व्या शतकाच्या अखेरीपासून १.२० सेल्सिअसने वाढले आहे. औद्योगिकीकरणामुळे कार्बन डाय ऑक्साईडच्या वाढीमुळे तापमानात १.३० अंश सेल्सिअसने वाढ झाली आहे. ही तापमान वाढ गेली अनेक वर्षे वाढत असून जग एका कधीही कल्पना न केलेल्या प्रदेशात लोटले जात आहे, असा इशारा जागतिक हवामानशास्त्र संस्थेने दिला आहे. गेल्या दहा वर्षांहून अधिक काळापासून १८० राष्ट्रे व प्रदेश एकत्र येऊन अर्थ अवर या उपक्रमाला पाठिंबा देत आहेत व स्वेच्छेने वीजवापर बंद ठेवण्याच्या या उपक्रमात सहभाग घेत आहेत.